महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८८ /२०२३

दि. १३/०६/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये डोंबिवली पश्चिमकडून पुर्वेला ठाकुर्ली चोळेगावकडे जाणारी वाहने ही बावनचाळ, ठाकुर्ली ब्रिजवरून पुढे ठाकुर्ली स्टेशनकडे जाण्याकरीता जोशी हायस्कुलजवळ नवीन ठाकुर्ली पूल संपल्यानंतर यु टर्न घेवून डावे वळण घेतात. त्यामुळे ठाकुर्ली स्टेशनकडून येणारी व डोंबिवली पश्चिमकडून ठाकुर्ली स्टेशनकडे जाणारी वाहने समोरासमोर येतात. सदर ठिकाणी वळणावर रस्ता अरूंद असल्याने समोरासमोर येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होवून वाहनचालकांमध्ये वाद होतात. तसेच किरकोळ अपघात होण्याची शक्यता आहे. याकरीता ठाकुर्ली ब्रिजवरून पुढे ठाकुर्ली स्टेशनकडे जाण्याकरीता जोशी हायस्कुलजवळ यु टर्न बंद करणे गरजेचे आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड,** पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद** १) डोंबिवली पश्चिमेकडून बावनचाळ, ठाकुर्ली ब्रिज संपल्यानंतर जोशी हायस्कुलजवळून डावे वळण घेवून ठाकुर्ली–चोळेगावकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जोशी हायस्कुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सरळ पुढे जावून नाना कानविंदे चौक येथून डावे वळण घेवून पंचायत बावडी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.